# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 06 January 2026

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०६ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.**

****

- महापालिका निवडणूक प्रक्रियेत बिनविरोध निवडीवरून विविध पक्षांमध्ये आरोप- प्रत्यारोप
- एसटी बस खरेदीची निविदा प्रक्रिया गतिमान करण्याचे परिवहन मंत्र्यांचे निर्देश
- दर्पण दिनानिमित्त आज विविध कार्यक्रमांचं आयोजन
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६६ वा दीक्षांत समारंभात सुमारे ६५ हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

आणि

- राज्यात बुधवारनंतर पुन्हा थंडीचा कडाका जाणवणार, हवामान तज्ज्ञांची माहिती

****

महापालिका निवडणूक प्रक्रियेत बिनविरोध निवडीवरून विविध पक्षांमध्ये आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. भाजप, काँग्रेस, शिवसेना तसंच मनसे आदी प्रमुख पक्षांचे नेते या मुद्यावरून परस्परांवर टीका करत आहेत. बिनविरोध निवडणुकांना विरोध करणाऱ्यांनी योग्य व्यासपीठावर न्याय मागावा असं आवाहन, भाजप नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं. ते काल छत्रपती संभाजीनगर विमानतळावर वार्ताहरांशी बोलत होते. निवडणूक बिनविरोध होऊ नये, असं कायद्यात लिहिलेलं नाही, निवडणूक आयोगाची देखील याला परवानगी आहे, याकडे बावनकुळे यांनी लक्ष वेधलं.

**

दरम्यान, महायुतीचे बिनविरोध निवडून आलेले उमेदवार हे लोकप्रियतेमुळे नव्हे तर पैसा आणि धाक, दडपशाहीच्या जोरावर निवडून आल्याची टीका, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले बहुतांश अधिकारी हे भ्रष्ट असल्याचा आरोपही त्यांनी केला. यासंदर्भातला अहवाल मिळूनही निवडणूक आयोगाने कुठलीही कारवाई केलेली नाही, याप्रकरणी तत्काळ कारवाईची मागणी सपकाळ यांनी केली.

****

ठाणे महानगरपालिका निवडणुकीत अर्ज मागे घेणाऱ्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या तीन उमेदवारांविरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी माजी खासदार राजन विचारे आणि मनसे नेते अविनाश जाधव यांनी ठाणे पोलिसांकडे केली आहे. यावर निवडणूक आयोगाकडून अहवाल आल्यानंतर कारवाई करू असं पोलिसांनी सांगितलं. सत्ताधाऱ्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून तसंच, पैशांचं आमिष दाखवून या तिघांना उमेदवारी अर्ज मागे घेण्यास भाग पाडल्याचा आरोप विचारे आणि जाधव यांनी केला.

दरम्यान, या महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याप्रकरणी मनसेनं मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या निवडणुकांमध्ये ६८ ठिकाणी झालेल्या बिनविरोध निवडणुकीला स्थगिती द्यावी आणि मोठ्या प्रमाणात झालेल्या अर्ज माघारीची न्यायालयीन चौकशी करावी असं मनसेनं या याचिकेत म्हटलं आहे.

****

मुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी काल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालना, परभणी तसंच नांदेड इथं प्रचार सभा घेतल्या. शासनाकडून राबवल्या जात असलेल्या विविध योजनांचा आढावा घेत, त्यांनी विरोधकांवर टीका केली.

नांदेडमध्ये इंदिरा गांधी मैदानावर झालेल्या जाहिर सभेत मुख्यमंत्र्यांनी, बेघरांना पाहिजे तेवढी घरे पंतप्रधान आवास योजनेतून देण्यात येणार असल्याचं सांगितलं. समृद्धी महामार्ग नांदेडपर्यंत जोडण्यात येत असल्याने मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालन्यानंतर आता तिसरं औद्योगिक केंद्र नांदेड होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

जालना इथंही फडणवीस यांनी सभेल संबोधित केलं. बियाणे, स्टीलसाठी प्रसिद्ध असलेल्या जालना शहरात मागील काळात केलेल्या विकासाच्या बळावर आणि येणाऱ्या काळात होणाऱ्या कामासाठी लोकांनी भाजपच्या हातात महापालिकेची सुत्रे द्यावी, असं ते म्हणाले.

परभणी महानगरपालिकेअंतर्गत महत्वाकांक्षी भूमीगत गटार योजना आणि सुधारित पाणी पुरवठा योजनेंतर्गत महानगरपालिकेचा कोट्यवधी रुपयांचा हिस्सा राज्य सरकार भरेल, असं आश्वासन फडणवीस यांनी, परभणीत जाहीर सभेत दिलं.

****

यंदाच्या निवडणुकीत प्रभाग रचना बदलल्यामुळे मतदारांनी एकाचवेळी अनेक उमेदवारांना मतदान करायचं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं २९ प्रभागांपैकी एक ते २८ प्रभागात प्रत्येकी चार तर २९ व्या प्रभागात तीन उमेदवार निवडून द्यायचे आहेत. या संदर्भात मनपा आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी नागरिकांना मतदान प्रक्रियेबाबत माहिती दिली...

**बाईट – मनपा आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत**

मनपा आयुक्तांनी दिलेल्या सविस्तर माहितीची चित्रफीत आपण आमच्या ट्वीटर हँडल तसंच फेसबुक पेजवर पाहू शकता.

****

देशातली पहिली स्वदेशी बनावटीची प्रदुषण नियंत्रक ‘समुद्र प्रताप’ युद्धनौका भारतीय तटरक्षक दलाच्या ताफ्यात काल दाखल झाली. गोव्यात झालेल्या या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते. ही युद्धनौका देशाचा सामूहिक दृढनिश्चय आणि आत्मविश्वास यांचं प्रतीक असल्याचं राजनाथसिंह यांनी नमूद केलं.

****

२०२० सालच्या दिल्ली दंगल प्रकरणातले आरोपी उमर खालिद आणि शरजील इमाम यांची जामीन याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. या आरोपींविरोधात बेकायदेशिर कारवाया प्रतिबंधक कायदा – युएपीए अंतर्गत खटला दाखल होऊ शकतो, असं न्यायालयानं म्हटलं आहे. या प्रकरणातल्या अन्य पाच आरोपींना मात्र न्यायालयाने जामिन मंजूर केला. फेब्रुवारी २०२० मध्ये नागरिकत्व सुधारणा विधेयकाविरोधात झालेल्या आंदोलनात ५३ जणांचा मृत्यू झाला होता.

दरम्यान, या दोन्ही आरोपींना पाठिंबा दिल्याबद्दल काँग्रेस पक्षानं माफी मागावी अशी मागणी भारतीय जनता पक्षानं केली आहे.

****

राज्य परिवहन महामंडळ–एसटीची सध्या सुरू असलेली निविदा प्रक्रिया गतिमान करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. एसटी महामंडळाच्या २०२५–२६ च्या अर्थसंकल्पीय निधीच्या वापराबाबत काल झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. एसटीच्या ताफ्यात या वर्षाअखेरपर्यंत आठ हजार नवीन बसेस दाखल होतील, यापद्धतीने ही निविदा प्रक्रिया राबवावी आदेश सरनाईक यांनी दिले. एसटीच्या विविध विभागांकडून सुरू असलेल्या संथ कारभारावर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

****

दर्पण दिन आज साजरा होत आहे. मराठी वृत्तपत्राचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी वृत्तपत्र सुरू केल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. या निमित्ताने पत्रकारिता महाविद्यालयांसह विविध संस्था संघटनांच्या वतीनं अनेक कार्यक्रमांच्या आयोजनातून आचार्य जांभेकरांना अभिवादन केलं जातं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६६ वा दीक्षांत समारंभ काल कुलगुरू डॉ विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. पुणे इथल्या 'आयसर' या राष्ट्रीय संस्थेचे संचालक डॉ.सुनील भागवत या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिक्षण, संशोधनातून आपल्यात निर्माण झालेल्या क्षमतेचा वापर समाज, मानवतेसाठी करा, असं आवाहन भागवत यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केलं. या समारंभात ५१ हजार ९४२ जणांना पदवी, १२ हजार ४६५ जणांना पदव्युत्तर पदवी, तसंच २६९ विद्यार्थ्यांना एमफील आणि पीएच.डी प्रदान करण्यात आली.

****

केंद्र सरकारने नुकतंच विकसित भारत रोजगार आणि उपजिविका हमी ग्रामीण – व्ही बी जी राम जी हे विधेयक संमत केलं आहे. या विधेयकामुळे ग्रामीण भागातल्या पायाभूत सुविधा आणि मुलभूत सेवा अधिक सक्षम होणार आहेत, असं लातूर जिल्ह्याच्या उदगीर तालुक्यातल्या नागलगाव इथले लाभार्थी संग्राम पवार यांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – संग्राम पवार**

****

महिला स्वयंसहायता समूहासाठी शासनाच्या उमेद या विक्री प्रदर्शन उपक्रमात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह तेरा जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत यांनी ही माहिती दिली. या उपक्रमाद्वारे बचत गटांसाठी वस्तू आणि उत्पादनांच्या विक्रीसाठी हक्काची तसेच कायमस्वरूपी बाजारपेठ शासनानं उपलब्ध करून दिली आहे.

****

१९ वर्षांखालील एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताने काल दक्षिण आफ्रिकेचा आठ गडी राखून पराभव केला. दक्षिण आफ्रिकेत बेनोनी इथं झालेल्या या सामन्यात यजमान संघाने प्रथम फलंदाजी करत २४६ धावांचं आव्हान दिलं होतं. मात्र खराब हवामानामुळे सामना २७ षटकांचा करुन, डकवर्थ लुईस नियमानुसार भारताला १७४ धावांचं लक्ष्य देण्यात आलं. तीन सामन्यांच्या या मालिकेत भारत एक – शून्यनं आघाडीवर आहे.

****

राज्यात थंडीचा कडाका काही प्रमाणात कमी झाला आहे. बहुतांश जिल्ह्यांचं किमान तापमान तेरा ते चौदा अंशांवर पोहोचलं असून, फक्त गोंदिया जिल्ह्यात सर्वात कमी साडे दहा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर तसंच परभणी इथंही काल किमान तापमान १५ अंश सेल्सियसपेक्षा अधिक नोंदवलं गेलं. बुधवारनंतर तापमानात घट होऊन थंडी जाणवेल असा अंदाज छत्रपती संभाजीनगर इथल्या एपीजे अब्दुल कलाम विज्ञान संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास औंधकर यांनी व्यक्त केला.

****